**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>**

दि. १९.०३.२०१६ रोजी सकाळी ११.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा ,सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| इंदूबाई शिवाजीराव घोगरे | विनयकुमार गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| शर्मा पुष्पाताई राजेश | कदम गंगाबाई नारायण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| जकीया बेगम स. मुखतार | इशरत फातेमा अ. शमीम |
| सलीमा बेगम नरुल्ला खान | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स.सदस्य, आयुक्त श्री सुशिल खोडवेकर, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, मुख्यलेखाधिकारी श्री मो. सादीक खान, मुख्य वैद्यकिय अधिकारी, डॉ. मो. आसीफ, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता, श्री सुग्रीव अंधारे, कार्यकारी अभियंता, श्री प्रकाश कांबळे कार्यकारी अभियंता बिएसयुपी व सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी याचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येते. आज सभेस अधिकारी व कर्मचारी उशिरा येत आहे. सर्व अधिकारी व कर्मचा-याना आदेशित करण्यात येते की, त्यांनी स्थायी समितीच्या सभेस वेळेवर येण्याची दक्षता घ्यावी.

**नगरसचिव** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील पीएनडिटी पथकाने शहरातील महाराणा प्रताप चौक भागातील संत ज्ञानेश्वर हॉस्पीटलमध्ये छापा टाकून तेथे लिंग निदान करुन हिंगोली जिल्हयातील एका महिलेचे अवैध गर्भपात केल्याचे निदर्शनास आल्यामूळे संबंधित डॉक्टरवर व कम्पाऊड विरुध्द कार्यवाही करण्यासाठी गुन्हा नोंदविला आहे स्थायी समितीच्या माहितीस्तव

**श्री उमेश चव्हाण** प्रशासना मार्फत **PCPNDT** अंतर्गत एका रुग्णालयावर गुप्त पध्दतीने कार्यवाही करण्यात आलेली असुन त्याबाबत मा. आयुक्त व आरोग्य विभागाचे हार्दीक अभिनंदन करण्याबाबत ठराव एकमताने पास करण्यात यावा.

**श्री विनय गुर्रम** श्री उमेश चव्हाण यांची अभिन्नदानाचा जो प्रस्ताव ठेवला त्यास माझे अनुमोदन आहे.

**श्री संजय मोरे** श्री उमेश चव्हाण यांची अभिन्नदानाचा जो प्रस्ताव ठेवला त्यास माझे अनुमोदन आहे.

**उपआयुक्त** कायदा करुनही डॉक्टर लिंग निदान करीत आहेत.

**सभापती** श्री उमेश चव्हाण, श्री विनय गुर्रम, व श्री संजय मोरे यांनी **PCPNDT** अंतर्गत एका रुग्णालयावर गुप्त पध्दतीने कार्यवाही करण्यात आलेली असुन त्याबाबत मा. आयुक्त व आरोग्य विभागाचा हार्दीक अभिनंदन करण्यात योतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २४५** **ठराव**

आयुक्त, नांवामनपा नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील **PCPNDT** पथकाने शहरातील महाराणा प्रताप चौक भागातील संत ज्ञानेश्वर हॉस्पीटलमध्ये गुप्त छापा टाकून तेथे लिंग निदान करुन हिंगोली जिल्हयातील एका महिलेचे अवैध गर्भपात केल्याचे निदर्शनास आल्यामूळे **PNDT** अंतर्गत संबंधित डॉक्टर व डॉक्टराच्या कम्पाऊंडर विरुध्द गुन्हा नोंदविला त्याबध्दल आयुक्त व महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील **PCPNDT** पथकाचे ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**विषय क्रं. ०१**

दिनांक १५.०२.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीचे सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत

**सभापती** मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. २४६** **ठराव**

दिनांक १५.०२.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीचे सभेचे इतिवृत्त कायम करण्यास ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं. ०२**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१६४६५/१६ दिनांक १४.०३.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत मा. महापौर व मा. आयुक्त मनपा नांदेड यांचे निवासस्थानी व्यवस्थापक महाराष्ट्र माजी सैनिक सेक्युरिटी सर्व्हीसेस (मेस्को) पुणे यांचे मार्फत सुरक्षारक्षक पुरवठा करण्यासाठी नावाशमनपा स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. १४ दिनारंक २७.०४.०६ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार ०६ सुरक्षारक्षकांची सेवेस कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/१५०९/१५

दिनांक ०५.०५.२०१५ अन्वये संबंधीत सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षकांची सेवा दिनांक २१.०२.२०१५ ते २०.०२.२०१६ या एका वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली तथापि संबंधीतांच्या सेवेची मुदतवाढ दिनांक २०.०२.२०१६ रोजी संपलील असल्यामुळे व्यवस्थापक मेस्को सेक्युरिटी सर्व्हीसेस यांचे पत्र दि. २३.०२.२०१६ अन्वये सादर केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुनश्च पुढील सेवेसाठी मुदतवाढ देण्याकरिता करारनामा सादर केला आहे.

करिता महाराष्ट्र माजी सैनिक सेक्युरिटी सर्व्हीसेस (मेस्को) पुणे यांनी पुरवठा केलेल्या ०६ सुरक्षारक्षकांच्या सेवेत दिनांक २१.०२.२०१६ ते २०.०२.२०१७ या एका वर्षासाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली **त्याची नोंद घेणे बाबत.**

**सभापती** आदेशाची नोंद ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते व हा ठरावयाच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २४७** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१६४६५/१६ दिनांक १४.०३.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत मा. महापौर व मा. आयुक्त मनपा नांदेड यांचे निवासस्थानी व्यवस्थापक महाराष्ट्र माजी सैनिक सेक्युरिटी सर्व्हीसेस (मेस्को) पुणे यांचे मार्फत सुरक्षारक्षक पुरवठा करण्यासाठी नावाशमनपा स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. १४ दिनारंक २७.०४.०६ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार ०६ सुरक्षारक्षकांची सेवेस कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/१५०९/१५ दिनांक ०५.०५.२०१५ अन्वये संबंधीत सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षकांची सेवा दिनांक २१.०२.२०१५ ते २०.०२.२०१६ या एका वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली तथापि संबंधीतांच्या सेवेची मुदतवाढ दिनांक २०.०२.२०१६ रोजी संपलील असल्यामुळे व्यवस्थापक मेस्को सेक्युरिटी सर्व्हीसेस यांचे पत्र दि. २३.०२.२०१६ अन्वये सादर केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुनश्च पुढील सेवेसाठी मुदतवाढ देण्याकरिता करारनामा सादर केला आहे.

करिता महाराष्ट्र माजी सैनिक सेक्युरिटी सर्व्हीसेस (मेस्को) पुणे यांनी पुरवठा केलेल्या ०६ सुरक्षारक्षकांच्या सेवेत दिनांक २१.०२.२०१६ ते २०.०२.२०१७ या एका वर्षासाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली **त्याची नोंद ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. ०३**

नावाशमनपा हद्दीत **महाराणा प्रताप चौक पुतळयास रंगरंगोटी करणेसाठी** विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रु. ६४,९४५/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ६४,९४५/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २४८** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **महाराणा प्रताप चौक पुतळयास रंगरंगोटी करणेसाठी** विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रु. ६४,९४५/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ६४,९४५/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०४**

मनपा पाणी पुरवठा व **मलनिस्ससारण झोन क्रं. D चे उप अथ्भयंता पापुवजनि विभाग मनपा नांदेड अंतर्गत येणारे हातपंप दिनांक ०४.०९.२०१५ ते २९.१२.२०१५ पर्यंत १०४ हातपंप दुरुस्ती केलेल्या** अहवालानुसार स्थानिक बाजारा प्रमाणे कामाची तातडी, गरज व आवश्यकता लक्षात घेवून **मे. अर्जून इलेक्ट्रीकल्स वर्कस नांदेड** या कंत्राटदारा कडून काम करुन घेण्यात आले आहे त्यास **रुपये ३,००,०००/-** (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) चा खर्च झालेला आहे

करिता सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय मान्यता देणेसाठी मनपा स्थायी समीती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २४९** ठराव

मनपा पाणी पुरवठा व **मलनिस्ससारण झोन क्रं. D चे उप अथ्भयंता पापुवजनि विभाग मनपा नांदेड अंतर्गत येणारे हातपंप दिनांक ०४.०९.२०१५ ते २९.१२.२०१५ पर्यंत १०४ हातपंप दुरुस्ती केलेल्या** अहवालानुसार स्थानिक बाजारा प्रमाणे कामाची तातडी, गरज व आवश्यकता लक्षात घेवून **मे. अर्जून इलेक्ट्रीकल्स वर्कस नांदेड** या कंत्राटदारा कडून काम करुन घेण्यात आले आहे त्यास **रुपये ३,००,०००/-** (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) चा खर्च झालेला आहे

करिता सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०५**

नावाशमनपा हद्यीत **स्टेडीयम परिसरात (क्षेत्रीय कार्यालय B चे) सर्वेक्षण करुन अस्तित्वातील नकाशा व** Countour map **तयार करणेसाठी** आदेशीत केल्यानुसार श्री गुरु गोविंदसिंघ्जजी स्टेडीयम परिसरातील VIP रोड ते गोकुळनगर, विष्णुपूरी रस्ता ते पुर्व बाजु रस्ता क्रं. २६ व पश्चिम बाजु ITM ते गोकुळनगर चौरस्ता या चर्तुसिमा मधील सर्व जागेचा कए मॅप तयार करणेसाठी **श्री वसमतकर संतोष ज्ञानोबा नांदेड** यांना सुचीत केले. त्यानुसार त्यांनी सदर जागेचा सविस्तर नकाशा जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार तयशर केले असुन त्यासाठी **रुपये ४,९३,९४५/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री वसमतकर संतोष ज्ञानोबा नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ४,९३,९४५/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५०** ठराव

नावाशमनपा हद्यीत **स्टेडीयम परिसरात (क्षेत्रीय कार्यालय B चे) सर्वेक्षण करुन अस्तित्वातील नकाशा व** Countour map **तयार करणेसाठी** आदेशीत केल्यानुसार श्री गुरु गोविंदसिंघ्जजी स्टेडीयम परिसरातील VIP रोड ते गोकुळनगर, विष्णुपूरी रस्ता ते पुर्व बाजु रस्ता क्रं. २६ व पश्चिम बाजु ITM ते गोकुळनगर चौरस्ता या चर्तुसिमा मधील सर्व जागेचा कए मॅप तयार करणेसाठी **श्री वसमतकर संतोष ज्ञानोबा नांदेड** यांना सुचीत केले. त्यानुसार त्यांनी सदर जागेचा सविस्तर नकाशा जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार तयशर केले असुन त्यासाठी **रुपये ४,९३,९४५/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री वसमतकर संतोष ज्ञानोबा नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ४,९३,९४५/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं ०६**

नावाशमनपा हद्यीत **प्रभाग क्रं. ३७ मध्ये कौठा भागात श्री अमील कंठवार यांचे घर ते विकासनगर मुख्य रस्त्यापर्यंत सि.सि. रस्ता करुन घेण्यात आले** असून या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **मे. स्वास्तिक कंन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास **रु. ४,६२,१००/-** खर्च झालेला आहे.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. स्वास्तिक कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,६२,१००/- यास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५१** ठराव

नावाशमनपा हद्यीत **प्रभाग क्रं. ३७ मध्ये कौठा भागात श्री अमील कंठवार यांचे घर ते विकासनगर मुख्य रस्त्यापर्यंत सि.सि. रस्ता करुन घेण्यात आले** असून या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **मे. स्वास्तिक कंन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास **रु. ४,६२,१००/-** खर्च झालेला आहे.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. स्वास्तिक कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,६२,१००/- यास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०७**

नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. ९ अंतर्गत कैलासनगर भागात अड. श्याम बन यांचे घर ते कैलाशनगर मुख्य रस्ता पर्यंत सी.सी. रस्ता करणे** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसूची २०१५-१६ नुसार **रुपये ४,००,०००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **झैनब कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर झैनब कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,००,०००/- यास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५२** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. ९ अंतर्गत कैलासनगर भागात अड. श्याम बन यांचे घर ते कैलाशनगर मुख्य रस्ता पर्यंत सी.सी. रस्ता करणे** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसूची २०१५-१६ नुसार **रुपये ४,००,०००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **झैनब कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर झैनब कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,००,०००/- यास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०८**

नावाशमनपा **पाणी पुरवठा व मलनिस्सारण झोन क्रमांक C अंतर्गत पावरपंप ०२ व हातपंप २७ हे उपअभियंता पापुवजनि विभाग मनपा नांदेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार** स्थानिक बाजाराप्रमाणे कामाची तातडी गरज व आवश्यकता लक्षात घेवुन **मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड** या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले आहे त्यास रुपये **२,१२,१२१/-** अक्षरी रुपये दोल लाख बारा हजार एकशे एकविस फक्त चचा खर्च झालेला आहे.

करिता सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५३** **ठराव**

नावाशमनपा **पाणी पुरवठा व मलनिस्सारण झोन क्रमांक C अंतर्गत पावरपंप ०२ व हातपंप २७ हे उपअभियंता पापुवजनि विभाग मनपा नांदेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार** स्थानिक बाजाराप्रमाणे कामाची तातडी गरज व आवश्यकता लक्षात घेवुन **मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टील वर्कस नांदेड** या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले आहे त्यास रुपये **२,१२,१२१/-** अक्षरी रुपये दोल लाख बारा हजार एकशे एकविस फक्त चचा खर्च झालेला आहे.

करिता सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **भुमिगत गटार देखभाल देरुस्ती करिता आरसीसी फ्रेम / कव्हर्स पुरवठा करुन बसविणे करिता** ई-टेंडरव्दारे प्रसिध्द करुन निविदा मागविली असता प्राप्त एक निविदा **इम्रान इंडस्ट्रीज नांदेड** यांची असुन निविदा धारकांनी दिलेले दर खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या तक्त्यात प्रस्तावित केलेले असुन सदरील दर अंतीम करणे करिता मा. आयुक्त यांच्या कक्षात वाटाघाटी अंती कंत्राटदाराच्या समंती पत्रानुसार अंतीम करण्यात आले त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरसीसी फ्रेम कव्हर साईज | निविदा धारकांनी भरलेले दर (Fixing) सह | अंदाजपत्रकीय दर पुरवठा | वाटाघाटी अंती मंजुर केलेले दर (Fixing) सहीत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ६०० x ४५० mm dia | ३९०० | २८४८ | ३०२८ |
| २ | ९०० x ४५० mm dia | ४३०० | ३३१३ | ३६४३ |
| ३ | ४५० mm dia | ४२०० | ३३१३ | ३६४३ |

उपरोक्त वरील प्रमाणे वाटाघाटी अंती रकाना क्रं. ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या दरास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच उपअभियंता यांनी सादर केलेले **अंदाजपत्रक रु. २२,५८,३६५/- यास मंजुर दरानुसार लाणार खर्च रुपये २४,७६,७७०/- (चोवीस लक्ष शहयात्तर हजार सातशे सत्तर फक्त) यास साहित्य खरेदी मलनिस्सारण या शिर्षकातुन लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठी सदरील प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २५४** ठराव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत **भुमिगत गटार देखभाल देरुस्ती करिता आरसीसी फ्रेम / कव्हर्स पुरवठा करुन बसविणे करिता** ई-टेंडरव्दारे प्रसिध्द करुन निविदा मागविली असता प्राप्त एक निविदा **इम्रान इंडस्ट्रीज नांदेड** यांची असुन निविदा धारकांनी दिलेले दर खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या तक्त्यात प्रस्तावित केलेले असुन सदरील दर अंतीम करणे करिता मा. आयुक्त यांच्या कक्षात वाटाघाटी अंती कंत्राटदाराच्या समंती पत्रानुसार अंतीम करण्यात आले त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरसीसी फ्रेम कव्हर साईज | निविदा धारकांनी भरलेले दर (Fixing) सह | अंदाजपत्रकीय दर पुरवठा | वाटाघाटी अंती मंजुर केलेले दर (Fixing) सहीत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ६०० x ४५० mm dia | ३९०० | २८४८ | ३०२८ |
| २ | ९०० x ४५० mm dia | ४३०० | ३३१३ | ३६४३ |
| ३ | ४५० mm dia | ४२०० | ३३१३ | ३६४३ |

उपरोक्त वरील प्रमाणे वाटाघाटी अंती रकाना क्रं. ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या दरास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच उपअभियंता यांनी सादर केलेले **अंदाजपत्रक रु. २२,५८,३६५/- यास मंजुर दरानुसार लाणार खर्च रुपये २४,७६,७७०/- (चोवीस लक्ष शहयात्तर हजार सातशे सत्तर फक्त) यास साहित्य खरेदी मलनिस्सारण या शिर्षकातुन लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता हि** मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. १०**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, **हद्यीत क्षेत्र - A व B मधील श्री गणपत्ती स्थापनेपासुन गणपवती विसर्जनापर्यंत मुरुम,** GSB ६mm **टाकण्यात आली आहे तसेच गणपत्ती विसर्जनाच्या वेळी पासदगांव व आसना घाट येथे** Roller, Water Tanker, Barracating, Labiour **लावण्यात आले आहे** तसेच दुर्गा देवीच्या वेळी ही सात्य टाकण्यात आले या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ३८,९३,१४९/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे.जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ३८,९३,१४९/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव स्थायी समिति समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५५** ठराव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, **हद्यीत क्षेत्र - A व B मधील श्री गणपत्ती स्थापनेपासुन गणपवती विसर्जनापर्यंत मुरुम,** GSB ६mm **टाकण्यात आली आहे तसेच गणपत्ती विसर्जनाच्या वेळी पासदगांव व आसना घाट येथे** Roller, Water Tanker, Barracating, Labiour **लावण्यात आले आहे** तसेच दुर्गा देवीच्या वेळी ही सात्य टाकण्यात आले या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ३८,९३,१४९/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे.जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ३८,९३,१४९/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ११**

नावाशमनपा हद्यीत **स्टेडीयम परिसरात जिमनॅशीयमचे स्थलांतर करणेसाठी** Aquirium **ची इमारत दुरुस्त करण्यासाठी** आदेशीत केल्यानुसार सदर इमारतीत आजपावेतो रंगरंगोटी, विधुत व्यवस्था, अल्युमिनियम खिडक्या, दोन प्रवेशव्दार, सुरक्षा भिंत व सि.सि. कॉंक्रेटचे काम आवश्यकतेनुसार पेव्हर ब्लॉक, रबर मॅट, टिनशेड, सिसि बेड, इत्यादी कामे करुन घेण्यात आली आहे त्यासाठी प्रचलीत जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार **रुपये २९,५७,१००/-** चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामे **मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड** यांच्याकडून करुन घेण्यात आलेले आहे.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माझ कंन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये २९,५७,१००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**आयुक्त** सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो महानगरपालिकेच्या क्रिडा संकुल परिसरातील श्री गुरु गोविंदसिंघजी क्रिकेट स्टेडियमचा आंतरराष्ट्रीय मानांकनाप्रमाणे विकासाचे काम अंतिम टप्यात असून अत्यंत चांगल्या प्रकारे स्टेडियमचा विकास करण्यात येत आहे. स्टेडियमच्या अनुषंगाने भविष्यात क्रिडा संकुल परिसरात आधुनिक सोई सुविधांसह महापालिका स्पोर्टस व रिक्रेयेशन क्लब क्रिडा संकुल परिसरात कै. शांताराम सगणे जलतरणीकेच्या लगत पूर्व बाजूस असलेल्या मोकळया जागेत तयार करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे. स्टेडियमची सर्व कामे पुर्ण झाल्यानंतर तेथे आपणास आंतराष्टीय व स्टेटलेव्हलचे रणजी ट्राफीचे क्रिकेटचे सामने घेता येतील, येणा-या क्रिकेट खेळाडूसाठी इन्टरटेन्टमेंटच्या दृष्टीकोनातून अद्यावत इनडोअर जलतरणिका, आधुनिक जिम्नॅशिय, रायफल शुटींग रेजं, बॉलींग ऍली, मिनी थिएटर कम कॉन्फरन्स हॉल, निवास व्यवस्था प्रत्येक टिम करीता १०-१० रुम बांधण्याचे प्रस्तावित आहे. जिम्नॅशियचे व इतर सर्व खेळाचे साहित्य थेट जागतीक व देशपातळीवरील नामकिंत मान्यता असलेल्या कंपनीकडून खरेदी केले तर महानगरपालिकेस ४० टक्के सुट मिळू शकते त्या दृष्टीकोनातून संबंधित कंपनीशी वाटाघाटी करण्यात येईल. आंतराष्ट्रीय किंवा स्टेटलेव्हलचा रणजी ट्राफीचा एक जरी सामना आयोजित केला तरी महानगरपालिकेस १५ कोटीचे उत्पन्न मिळू शकते. कै. शांताराम संगणे जलतरणिकेतील ९० टक्के पाण्याचे रिसायक्लींग करण्यात येते व खराब पाणी हे स्टेडीयमच्या परिसरतील लॉनला देण्यात येत असल्यामूळे पाण्याच अपव्यव होत नसल्याने आपण स्विमींग पुल चालू ठेवणार आहोत. स्विमींगपुलचे व जिम्नॅशियमचे दर कमी आहे. सध्या ३०० रुपये घेण्यात येतात अद्यावत जिम्नॅशियम सुरु केल्यानंतर आपणास ते ६०० रुपये करावे अशी प्रशासनाची मागणी आहे. स्टेडियम, व स्मींगपुल व जिम्नॅशियम या पासुन मिळणारे उत्पन्नाकरीता स्वतंत्र तीन खाते उघडून त्यात जमा करण्यात येईल आणि मिळालेले सर्व उत्पन्न हे स्टेडियम व सवीमींगपुल व जिम्नॉशियमवर वरच खर्च करण्याचा मानस आहे. श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियमच्या परिसरात लॉन टेनिस, बॅटमिटंन, स्कॅश सुरु करण्यासाठी गुरुव्दारा बोर्ड नांदेड यांचेकडून आर्थिक मदत मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अफगाणिस्थान सारख्या देशाबरोबर आंतरराष्ट्रीय किंवा राज्य स्तरीय महाराष्ट्र विरुध्द आंन्ध्रे रणजी ट्राफीचे क्रिक्रेटचे ५-६ सामने घेतले तरी आपण केलेला खर्च वाया जाणार नाही.

स्पोर्टस व रिक्रेयेशन क्लबचे सभासद होण्याकरीता सर्व सामान्य नागरीकांसाठी आजिव सभासद शुल्क रु. ३.०० लक्ष, नावाशंमनपा स.सदस्यांसाठी आजिव सभासद शुल्क, रु. २.०० लक्ष, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी आजिव सभासद शुल्क रु. १.०० लक्ष याप्रमाणे दर निश्चित करण्यासाठी सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात आलेली आहे.सर्व स.सदस्यांनी यात सहभाग नोंदवावा.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५६** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **स्टेडीयम परिसरात जिमनॅशीयमचे स्थलांतर करणेसाठी** Aquirium **ची इमारत दुरुस्त करण्यासाठी** आदेशीत केल्यानुसार सदर इमारतीत आजपावेतो रंगरंगोटी, विधुत व्यवस्था, अल्युमिनियम खिडक्या, दोन प्रवेशव्दार, सुरक्षा भिंत व सि.सि. कॉंक्रेटचे काम आवश्यकतेनुसार पेव्हर ब्लॉक, रबर मॅट, टिनशेड, सिसि बेड, इत्यादी कामे करुन घेण्यात आली आहे त्यासाठी प्रचलीत जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार **रुपये २९,५७,१००/-** चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामे **मे. माझ कन्सट्रक्शन नांदेड** यांच्याकडून करुन घेण्यात आलेले आहे.

कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माझ कंन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये २९,५७,१००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. १२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **बिएसयुपी योजने अंतर्गत पंधे इन्फ्राकॉन्स प्रा. लि. सोलापुर यांना विविध कामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.** सदरील बिएसयुपी योजनेची कामे करीत असतांना **पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर या कंत्राटदारास घरकुल बांधकामाच्या कामास विलंब झाल्याने दंड आकारण्यात आला आहे. पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर या कंत्राटदाराने दिनांक १५.०५.२०१५ च्या पत्राव्दारे सदर दंडाची रक्कम माफ करण्याची विनंती केली आहे.**

तसेच बिएसयुपी योजना इन-सिटू प्रकारची असल्यामुळे याठिकाणी अस्तित्वातील कच्ची घरे काढून जागा रिकामी करण्यासाठी वेळ लागला. झोपडपट्टी भागामध्ये रस्ते अरुंद असल्यामुळे मशिनरी इत्यादीचा वापर करुन काम करणे शक्य झाले नाही. व मध्यंतरीच्या काळात वाळुचा लिलाव करणेस विलंब झाल्याने कामाची गती मंदावली व एकाच वेळेस शहरात अनेक ठिकाणी घरकुलांची कामे चालु असल्यामुळे लेबरचा व बांधकाम साहित्याचा तुटवडा झाला म्हणुन कामाची गती मंदावली, असेही कंत्राटदारानी त्यांच्या विनंती अर्जात नमुद केले आहे तसेच सद्यस्थितीमध्ये कंत्राटदाराची उपलब्ध वावानुसार कामे पुर्ण झाली आहेत.

**पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर यांच्या एकूण ३७ कामाच्या विविध ठिकाणच्या कामास रुपये १,५६,९३,३८७/- ऐवढा दंड आकारण्यात आला आहे निविदा अट क्रं. ३० नुसार आकारण्यात आलेली दंडाची रक्कम माफ करावयाची झाल्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे करिता सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.**

**उमेशसिंह चव्हाण** प्रशासनाकडून प्रस्ताव आलेला आहे त्यास मान्यता देण्यात यावी.

**सभापती** प्रशासनाने पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर यांच्या एकूण ३७ कामाच्या विविध ठिकाणच्या कामास रुपये १,५६,९३,३८७/- ऐवढा दंड आकारण्यात आला आहे निविदा अट क्रं. ३० नुसार आकारण्यात आलेली दंडाची रक्कम माफ करावयासाठी पशासना तर्फे प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर केलेला असुन त्यास पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर यांना लावण्यात आलेला दंड हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते माफ करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २५७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **बिएसयुपी योजने अंतर्गत पंधे इन्फ्राकॉन्स प्रा. लि. सोलापुर यांना विविध कामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.** सदरील बिएसयुपी योजनेची कामे करीत असतांना **पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर या कंत्राटदारास घरकुल बांधकामाच्या कामास विलंब झाल्याने दंड आकारण्यात आला आहे. पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर या कंत्राटदाराने दिनांक १५.०५.२०१५ च्या पत्राव्दारे सदर दंडाची रक्कम माफ करण्याची विनंती केली आहे.**

तसेच बिएसयुपी योजना इन-सिटू प्रकारची असल्यामुळे याठिकाणी अस्तित्वातील कच्ची घरे काढून जागा रिकामी करण्यासाठी वेळ लागला. झोपडपट्टी भागामध्ये रस्ते अरुंद असल्यामुळे मशिनरी इत्यादीचा वापर करुन काम करणे शक्य झाले नाही. व मध्यंतरीच्या काळात वाळुचा लिलाव करणेस विलंब झाल्याने कामाची गती मंदावली व एकाच वेळेस शहरात अनेक ठिकाणी घरकुलांची कामे चालु असल्यामुळे लेबरचा व बांधकाम साहित्याचा तुटवडा झाला म्हणुन कामाची गती मंदावली, असेही कंत्राटदारानी त्यांच्या विनंती अर्जात नमुद केले आहे तसेच सद्यस्थितीमध्ये कंत्राटदाराची उपलब्ध वावानुसार कामे पुर्ण झाली आहेत.

**पंधे इन्फ्राकॉन्स सोलापुर यांच्या एकूण ३७ कामाच्या विविध ठिकाणच्या कामास रुपये १,५६,९३,३८७/- ऐवढा दंड आकारण्यात आला आहे निविदा अट क्रं. ३० नुसार आकारण्यात आलेली दंडाची रक्कम माफ हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. १३**

नावाशमनपा **हद्यीत क्षेत्र - C अंतर्गत किरकोळ दुरुस्तीची कामे जसे रस्ते दुरुस्ती, नाली दुरुस्ती, प्रभागातील किरकोळ कामे, पावसाळया पुर्वी करावयाची कामे, १५ ऑगस्ट २०१५, २६ जानेवारी २०१६ ला रंगरंगोटी करणे, हल्लाबोल, दिवाळी पहाट, महास्नान (उर्वशीघाट), तख्तस्नान, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या वेळेस शिडी लावणे, श्री गणेश विसर्जन मिरवणुक मार्गाची दुरुस्ती करणे, घाट दुरुस्ती, रमजान ईद निमित्य सर्व मस्जीद जवळ रस्ते दुरुस्त करणे तसेच मस्जीदवर कापड झाकणे, विसर्जन स्थळी ट्रक्टर** Leveller **मारणे, माती उचलणे, चुरी** ६ mm **टाकून दबई करणे, तसेच पोलीस परेड ग्राऊंड वर** Roller **ने दबई करणे, इदगाह मैदान, खालसा हायस्कूल मैदानवर** Roller **ने दबई करणे. मनपा प्रशासकिय आदेशातील सर्व नमुद कामे, आणि स. सदस्य यांनी प्रभागातील सुचविलेली सर्व कामे जुन २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत करुन घेण्यात आले** त्यानुसार या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपय २८,९०,७०२/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. माझा कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून तातडीने विना निविदा अंदाजपत्रक दरावर करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माझा कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये २८,९०,७०२/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २५८** **ठराव**

नावाशमनपा **हद्यीत क्षेत्र - C अंतर्गत किरकोळ दुरुस्तीची कामे जसे रस्ते दुरुस्ती, नाली दुरुस्ती, प्रभागातील किरकोळ कामे, पावसाळया पुर्वी करावयाची कामे, १५ ऑगस्ट २०१५, २६ जानेवारी २०१६ ला रंगरंगोटी करणे, हल्लाबोल, दिवाळी पहाट, महास्नान (उर्वशीघाट), तख्तस्नान, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या वेळेस शिडी लावणे, श्री गणेश विसर्जन मिरवणुक**

**मार्गाची दुरुस्ती करणे, घाट दुरुस्ती, रमजान ईद निमित्य सर्व मस्जीद जवळ रस्ते दुरुस्त करणे तसेच मस्जीदवर कापड झाकणे, विसर्जन स्थळी ट्रक्टर** Leveller **मारणे, माती उचलणे, चुरी** ६ mm **टाकून दबई करणे, तसेच पोलीस परेड ग्राऊंड वर** Roller **ने दबई करणे, इदगाह मैदान, खालसा हायस्कूल मैदानवर** Roller **ने दबई करणे. मनपा प्रशासकिय आदेशातील सर्व नमुद कामे, आणि स. सदस्य यांनी प्रभागातील सुचविलेली सर्व कामे जुन २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत करुन घेण्यात आले** त्यानुसार या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपय २८,९०,७०२/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. माझा कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून तातडीने विना निविदा अंदाजपत्रक दरावर करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माझा कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये २८,९०,७०२/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. १४**

नावाशमनपा योजने अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. २ अशोकनगर भागा अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता रितसर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. १०५ दिनांक १०.०९.२०१३ रोजी पारीत करुन मंजुर दरानुसार रुपये ७५,५०,३९३/- यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन निविदा मंजुर करण्यात अली होती. त्यास मनपा कार्यालयीन आदेश क्रं. पापुवजनि/१९८७१/१३ दिनांक १४.११.२०१३ अन्वये कार्यारंभ आदेश **इंद्रजा कंस्ट्रक्शन उस्मानाबाद** यांना दिनांक ०१ डिसेंबर २०१३ पासुन कामाचे आदेश मार्च २०१५ पर्यंत निर्गमीत करण्यात आले आहे. त्यानुसार मार्च २०१५ पर्यंत मनपा स्थायी समिती ठराव क्रं. १५६ दिनांक ०६.११.२०१५ अन्वये देयक अदाई करण्यात आले आहे व त्यास नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सन २०१५-१६ साठी माहे एप्रिल ते नोव्हेंबर पर्यंतचे देयक खालील प्रमाणे उपअभियंता यांनी सादर केले आहे.

| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. | देयक कालावधी | पाणी पुरवठा | मलनिस्सारण | एकूण देयक रु. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| झोन क्रं. २ अशोकनगर | ०१.०४.२०१५ ते ३०.०६.२०१५ | ६,०४,७३६/- | ८,३५,८१८/- | १४,४९,५५४/- |
| अतिरिक्त बाब | ०१.०४.२०१५ ते ३०.०६.२०१५ | ५,२५,९७३/- | २,००,२०२/- | ७,२६,१७५/- |
| झोन क्रं. २ अशोकनगर | ०१.०७.२०१५ ते ३०.०९.२०१५ | ९,३२,६७६/- | ८,१७,९४९/- | १७,५०,६२५/- |
| अतिरिक्त बाब | ०१.०७.२०१५ ते ३०.०९.२०१५ | ५,०६,७२०/- | ५,००,०००/- | १०,०६,७२०/- |
| झोन क्रं. २ अशोकनगर | ०१.१०.२०१५ ते ०४.११.२०१५ | १७,७८,३९०/- | ६,४२,६६४/- | २४,२१,०५४/- |
| अतिरिक्त बा | ०१.१०.२०१५ ते ०४.११.२०१५ | ७९,१९७/- | ७९,१९८/- | १,५८,३९५/- |
| **एकूण रुपये** | | **४४,२७,६९२/-** | **३०,७५,८३१/-** | **७५,०३,५२३/-** |

कार्यारंभ आदेश नुसार अद्याप पर्यंत ०१ एप्रिल २०१५ ते ०४ नोव्हेंबर २०१५ पर्यंत देयका पोटी सदरील कामावर एकूण खर्च रुपये ७५,०३,५२३/- होत असुन रकाना क्रं. ५ मधील उपरोक्त देयक एकूण आठ महिण्याचे देयक अदायी करणेसाठी मनपा स्थायी समितीची प्रशासकिय व आर्थीक मान्यते करीता सादर. तसेच सदरील कामावर होणारा खर्च मागील वर्षीच्या थकीत देयके अदाईसाठी करण्यात आलेल्या (स्पील वर्क) या लेखा शिर्षातुन खर्च करण्यास मान्यता देणे योग्य.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २५९** **ठराव**

नावाशमनपा योजने अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. २ अशोकनगर भागा अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता रितसर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. १०५ दिनांक १०.०९.२०१३ रोजी पारीत करुन मंजुर दरानुसार रुपये ७५,५०,३९३/- यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन निविदा मंजुर करण्यात अली होती. त्यास मनपा कार्यालयीन आदेश क्रं. पापुवजनि/१९८७१/१३ दिनांक १४.११.२०१३ अन्वये कार्यारंभ आदेश **इंद्रजा कंस्ट्रक्शन उस्मानाबाद** यांना दिनांक ०१ डिसेंबर २०१३ पासुन कामाचे आदेश मार्च २०१५ पर्यंत निर्गमीत करण्यात आले आहे. त्यानुसार मार्च २०१५ पर्यंत मनपा स्थायी समिती ठराव क्रं. १५६ दिनांक ०६.११.२०१५ अन्वये देयक अदाई करण्यात आले आहे व त्यास नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सन २०१५-१६ साठी माहे एप्रिल ते नोव्हेंबर पर्यंतचे देयक खालील प्रमाणे उपअभियंता यांनी सादर केले आहे.

| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. | देयक कालावधी | पाणी पुरवठा | मलनिस्सारण | एकूण देयक रु. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| झोन क्रं. २ अशोकनगर | ०१.०४.२०१५ ते ३०.०६.२०१५ | ६,०४,७३६/- | ८,३५,८१८/- | १४,४९,५५४/- |
| अतिरिक्त बाब | ०१.०४.२०१५ ते ३०.०६.२०१५ | ५,२५,९७३/- | २,००,२०२/- | ७,२६,१७५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| झोन क्रं. २ अशोकनगर | ०१.०७.२०१५ ते ३०.०९.२०१५ | ९,३२,६७६/- | ८,१७,९४९/- | १७,५०,६२५/- |
| अतिरिक्त बाब | ०१.०७.२०१५ ते ३०.०९.२०१५ | ५,०६,७२०/- | ५,००,०००/- | १०,०६,७२०/- |
| झोन क्रं. २ अशोकनगर | ०१.१०.२०१५ ते ०४.११.२०१५ | १७,७८,३९०/- | ६,४२,६६४/- | २४,२१,०५४/- |
| अतिरिक्त बा | ०१.१०.२०१५ ते ०४.११.२०१५ | ७९,१९७/- | ७९,१९८/- | १,५८,३९५/- |
| **एकूण रुपये** | | **४४,२७,६९२/-** | **३०,७५,८३१/-** | **७५,०३,५२३/-** |

कार्यारंभ आदेश नुसार अद्याप पर्यंत ०१ एप्रिल २०१५ ते ०४ नोव्हेंबर २०१५ पर्यंत देयका पोटी सदरील कामावर एकूण खर्च रुपये ७५,०३,५२३/- होत असुन रकाना क्रं. ५ मधील उपरोक्त देयक एकूण आठ महिण्याचे देयक अदायी करणेसाठी मनपा स्थायी समितीची प्रशासकिय व आर्थीक मान्यते करीता सादर. तसेच सदरील कामावर होणारा खर्च मागील वर्षीच्या थकीत देयके अदाईसाठी करण्यात आलेल्या (स्पील वर्क) या लेखा शिर्षातुन खर्च करण्यास मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. १५**

**नावाशमनपा हद्यीतील झोन क्रं. ड अंतर्गत नादुरुस्त रस्ते दुरुस्त करणेसाठी आदेशीत केल्यानुसार सदरचे रस्ते क्षेत्रीय कार्यालय ३ प्रभाग क्रं. ३६ ते ४० मधील रस्ते पावसाळयात पाणी साचुन ते खराब झाल्याने ते रस्ते दुरुस्ती करणे तसेच रमजान ईद, १५ ऑगस्ट, गणेश उत्सव, गणेश विसर्जन, दुर्गा उत्सव, दुर्गा विसर्जन व माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण यांच्या क्षेत्रीय कार्यालय क्रं (ड) येथील दौ-या निमित्त दुरुस्त करुन घेण्यात आले त्याच प्रमाणे प्रभाग क्रं. ३७, प्रभाग क्रं. ३८, प्रभाग क्रं. ३९, प्रभाग क्रं. ४० या सर्व प्रभागातील रस्ते दुरुस्त करुन घेण्यात आले** असून या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड** यांचे कडून करुन घेण्यात आले त्यास **रुपये ७२,२२,७१५/-** खर्च झालेला आहे.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ७२,२२,७१५/- यास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

ठराव क्रं. २६० ठराव

**नावाशमनपा हद्यीतील झोन क्रं. ड अंतर्गत नादुरुस्त रस्ते दुरुस्त करणेसाठी आदेशीत केल्यानुसार सदरचे रस्ते क्षेत्रीय कार्यालय ३ प्रभाग क्रं. ३६ ते ४० मधील रस्ते पावसाळयात पाणी साचुन ते खराब झाल्याने ते रस्ते दुरुस्ती करणे तसेच रमजान ईद, १५ ऑगस्ट, गणेश उत्सव, गणेश विसर्जन, दुर्गा उत्सव, दुर्गा विसर्जन व माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण यांच्या क्षेत्रीय कार्यालय क्रं (ड) येथील दौ-या निमित्त दुरुस्त करुन घेण्यात आले त्याच प्रमाणे प्रभाग क्रं. ३७, प्रभाग क्रं. ३८, प्रभाग क्रं. ३९, प्रभाग क्रं. ४० या सर्व प्रभागातील रस्ते दुरुस्त करुन घेण्यात आले** असून या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड** यांचे कडून करुन घेण्यात आले त्यास **रुपये ७२,२२,७१५/-** खर्च झालेला आहे.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ७२,२२,७१५/- यास महाराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. १६** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. ३६ मधील श्री शंकर खानसोळे यांचे घर ते श्री वामनराव खराणे यांचे घरा पर्यंत रस्ता अत्यंत खराब झाल्यामुळे सदरील भागातील नागरीकांना फार त्रास होत आहे व महादेव मंदिरास दर्शनासाठी जाण्यासाठी सुध्दा त्रास होत आहे म्हणुन २० फुट रुंदीचा आरसीसी रस्ता करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**सुचक**:- संजय गंगाधरराव मोरे **अनुमोदक**:- फारुख हुसेन बदवेल

**आयुक्त** प्रस्तावात किती लांबीचा रस्ता करावयाचा व त्यासाठी किती खर्च येत आहे याचा उल्लेख नाही. नाही त्यामूळे प्रस्तावित काम करण्यासाठी स्थळ पाहणी करुन कामाचे अंदाजत्रक तयार करुन पुढील कार्यवाही करण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**उमेशसिंह चव्हाण** या कामासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून काम करुन घेण्याचे पुर्ण अधिकार आयुक्तांना देण्यात येते.

**सभापती** स. सदस्यांच्या प्रस्तावा अंशता दुरुस्ती करुन विहित प्रक्रिया अवलंबवून लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तानी पुढील वेधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. २६१** **ठराव**

नावाशमनपा हद्यीत प्रभाग क्रं. ३६ मधील श्री शंकर खानसोळे यांचे घर ते श्री वामनराव खराणे यांचे घरा पर्यंत रस्ता अत्यंत खराब झाल्यामुळे सदरील भागातील नागरीकांना फार त्रास होत आहे व महादेव मंदिरास दर्शनासाठी जाण्यासाठी सुध्दा त्रास होत आहे म्हणुन २० फुट रुंदीचा आरसीसी रस्ता करण्यासाठी विहित प्रक्रिया अवलबवुन लागणा-या खर्चास प्रशासकिय आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेले तातडीचे विषय**

**विषय क्रं.०१**

नावाशमनपा हद्यीत **प्रभाग क्रं. A व D अंतर्गत उघडया नालीवर चेंबर कव्हर्स टाकणेसाठी विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन झोन A-२२, झोन B-४५ व झोन C-४३ असे एकूण ११० फ्रेम कव्हर्स रस्त्यालगतच्या नालीवर टाकून घेण्यात आलेले** असुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ४,९५,०००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. सोहेल कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले

कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने निविदा न मागविता अंदाजपत्रक दरावर **मे. साहेल कन्सट्रक्शन नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी लागणारा खर्च रुपये ४,९५,०००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्रं. २६२** **ठराव**

नावाशमनपा हद्यीत **प्रभाग क्रं. A व D अंतर्गत उघडया नालीवर चेंबर कव्हर्स टाकणेसाठी विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन झोन A-२२, झोन B-४५ व झोन C-४३ असे एकूण ११० फ्रेम कव्हर्स रस्त्यालगतच्या नालीवर टाकून घेण्यात आलेले** असुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार **रुपये ४,९५,०००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **मे. सोहेल कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले

कामाची तातडी निकड लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने निविदा न मागविता अंदाजपत्रक दरावर **मे. साहेल कन्सट्रक्शन नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास व कामासाठी लागणारा खर्च रुपये ४,९५,०००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरी ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विनय गुर्रम** श्री विनय पाटील सभापती असतांना त्यांच्या कार्यकाळात पार्श्वा असोसिएटस हे तुरटी पुरवठाधारक ज्या उत्पादकाची तुरटी महापालिकेस पुरवठा करणार आहेत, त्या उत्पादकाच्या कंपनीची एका पथका मार्फत स्थळ पाहणी करुन तुरटीच्या दर्जाबाबत खातरजमा करणे आवश्यक वाटते म्हणून त्यासाठी स्थळ पाहणी करुन तुरटीच्या दर्जाबाबत खातरजमा करण्याकरीता पथकाची नियुक्ती करण्यात आली होती या पथकाचा मी एक सदस्य आहे. त्या अनुषंगाने पार्श्वा असोसिएटस या तुरटी पुरवठाधारक महापालिकेस पुरवठा करत असलेल्या तुरटीचे नमुने शासन मान्य किंवा समकक्ष प्रयोगशाळेत तपासणी करीता पाठविण्याची मा. सभापती महोदया व मा. आयुक्तांनी परवानगी दयावी

**आयुक्त** तुरटी टेस्टींग करीता पाठविण्यासाठी आयुक्तांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.सभापती जे आदेश देतील त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**सभापती** मे. पार्श्वा असोसिएटस नागपुर यांचे मार्फत महापालिकेस जी तुरटी पुरवठा करण्यात येत आहे त्यांचे Sample घेऊन सील करुन त्याची तपासणी शासन मान्य किंवा समकक्ष प्रयोगशाळेत करुन तपासणी अहवाल या सभागृहासमोर सादर करण्या करिता समिती सदस्यांना परवानगी देण्यात येते.

**ठराव क्रं. २६३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस पार्श्वा असोसिएटस नागपुर हे तुरटी पुरवठा करीत आहे. परंतु हे तुरटी पुरवठाधारक ज्या उत्पादकांची तुरटी महापालिकेस पुरवठा करणार आहेत असे निविदेत नमुद करुन कामाचे आदेश प्राप्त केले याबाबत संधीग्दता निर्माण झाल्यामुळे तुरटी उत्पादकांच्या तुरटीच्या दर्जाबाबत खातरजमा करणेकरिता तत्कालीन स्थायी समितीने नगरसेवक व अधिकारी यांची जी समिती नियुक्त केली होती. त्या समितीने तुरटी उत्पादकाच्या जागेची स्थळ पहाणी केलेली आहे सदरचा स्थळ पाहणी अहवाल स्थायी समितीस सादर करणेपुर्वी पार्श्वा असोसिएटस नागपुर यांचे मार्फत महापालिकेस जी तुरटी पुरवठा करण्यात येत आहे त्या तुरटीचे समितीच्या सदस्यांनी Sample घेवुन सिल केल्यानंतर शासन मान्य किंवा समकक्ष प्रयोगशाळेत तपासणी करावी व त्या बाबतचा अहवाल स्थायी समितीच्या सभेस सादर करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**फारुख हुसेन** मागील ३ वर्षापासून माझा प्रभाग क्र. २८ मधील रजानगर, केळी मार्केट भागातपाण्याची समस्या आहे या भागात सुरळीत पाणी पुरवठा होणेसाठी वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहे, जर बुस्टर पंप बसविला तर माझ्या प्रभागातील नागरीकांना पाणी पुरवठा होवू शकेल. प्रशासनास बुस्टर पंप बसविण्यास काय अडचण आहे.

याचा खुलास करण्यात यावा. प्रभागाच्या बाजुचे १०० लोक नागरीक पाणी पटी न भरता फुकटचे पाणी वापरीत असुन ते पाइप लाईनला कनेक्शन करुन देत नाही.

**आयुक्त** श्री अंधारे यांनी स्थळ पाहणी करुन पाण्याचा प्रश्न कसा सोडविता ते पहावे. पाईप लाईन जोडण्यास काय अडचण आहे. बुस्टर पंप बसविला तर इतर भागातील नागरीकांना पाणी मिळणार नाही. पाणी पुरवठा कनेक्शन देवून पाणी पुरवठा झाला नाही तर शेवटी बुस्टर पंप बसविण्याचा विचार करण्यात येइल.

**उपआयुक्त** रजानगर, केळी मार्केट व त्या परिसरात चौफाळा, किल्ला, शक्तीनगर, वजिराबाद येथील पाण्याच्या टाकीवरुन पाणी पुरवठा करण्यात येतो.जून्या भागातील काही भागात मागील १५ वर्षापासून पाणी पुरवठा होत नव्हता नविन योजनेव्दारे त्याभागास पाणी पुरवठा होत आहे. त्यामूळै त्याभागातील नागरीकाचा त्या भागातील पाईप लाईन वरुन दुस-या भागात पाणी पुरवठा लाईन कनेक्शन देण्यास विरोध आहे. या नागरीकांना त्यांच्या मनात विश्वास निर्माण करुन द्यावा लागेल की नविन कनेक्शन देण्सयात आल्या नंतर आपल्या भागातील पाणी कमी होणार नाही. पाणी कमी झाले तर पाणी पुरठा कनेक्शन कट करु असे आश्वासन द्यावे लागेल.

**आयुक्त** श्री रत्नाकर वाघमारे यांनी सांगितल्या प्रमाणे रजानगर, केळी मार्केट व त्या परिसराज चार पॉईन्टवरुन पाणी पुरवठ करण्यात येतो. सध्या जून्या नांदेड भागात पाणी पुरवठयाच्या चार योजना असून ,पहिली योजना निजाम काळातील १९३६, १९६९, २००५ व आताची जेएनएनपयुआरएम योजना या चारही योजना कार्यान्वीत आहेत शेवटीची जेएनएनआरएमची पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यामूळे पुर्वीच्या तीन योजनेती पाईप लाईनचे कनेक्शन कट करणे आवश्यक आहे. पुर्वीच्या योजनेतील डिसप्युट पाईप लाईनी बंद न केल्यामूळे काही भागात खराब पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहे. रजानगर, केळी मार्केट भागात सुरळीत पाणी पुरवठा करण्याचा मार्ग निश्चित काढण्यात येइल.

**फारुख हुसेन** रजानगर, केळी मार्केट करीता शक्तीनगर, हैदरबाग्र पाण्याच्या टाकीपासून थेट पाईप लाईन टाकली तर या भागातील पाण्याचा प्रश्न सुटू शकतो.

**आयुक्त** २०४० पर्यतची लोकसंख्या विचारात घेवून पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आलेली असून असदवन, नविन डंकिंन, काबरानगर या केद्राची १६९ मिलियन लिटर पाणी शुध्द करण्याची क्षमता आहे. महानगरपालिकेकडे पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारे पाईप उपलब्ध्द आहे.पाण्याचीही कमतरता नाही. सध्या विष्णुपुरी जलाशयात ११.४ दलघमि पाणी साठा उपलब्ध्द असून तो आपणास एप्रिल पर्यत पुरेल ,पर्यायी आसना नदी पाणी पुरवठा योजना डिसेंबर पासून कार्यान्वीत करण्यात आलेली असून या योजनेतुव्दारे पावसाळयापर्यत पाणी पुरवठयाचे नियोजन करण्यात आलेले आहे. सध्या पाण्याची काही अडचण नाही परंतु प्रापर्ली पाणी पुरवठयाचे झोनींग झालेली नसल्यामूळे काही भागात समस्या आहेत त्या हळुहळु दुर करण्यात येतील.जून्या पाईप लाईन बंद कराव्या लागतील व या जून्या पाईप लाईन बंद केल्यामूळे पाणी पुरवठा होणार नाही अशी जी नागरीकांच्या मनात भिती आहे ती दुर करावी लागणार आहे.

**विनय गुर्रम** आज ना उद्या आपणास सोल्यूशन काढून पाणी पुरवठा करावा लागणार असल्याने पाणी पुरवठयाची कामे पिकअप करावे.

**आयुक्त** महानगरपालिकेच्या मालमत्ता रजिस्टरवर ७० हजार मालमत्ताची नोंद असून असून पेपरवर फक्त २३ हजार नळ कनेक्शन आहे,यामध्ये खुप मोठी समस्या आहे. शहरात बिएसयुपी योजने अंतर्गत १६ हजार धराचे बांधकाम केलेले असून घराचे बांधकाम करण्यापुर्वी त्याठिकाणी नळ कनेक्शन होते परंतु संबंधित घराचे मालक पुर्वीचे नळ कनेक्शन नाही आणि नविन पाणी पुरवठा कनेक्शनचे बिलच मिळालेच नाहीत असे सांगत आहे. शहरातील पुर्ण मालमत्तांचे संगणकियकरण करण्यात येत असून येत्या ४-५ महिण्यात नळ कनेक्शनचा व मालमत्तेचा सर्व्हे करुन नविन मालमत्तना नियमाप्रमाणे पाणी पटी मालमत्ता कर आकारण्यात येईल यापासुन जवळपास २०० कोटीचा उत्पन्न मिळू शकेल.शासनाने एलबीटी बंद केला असून त्यापोटी शासनाकडून ५० टक्के अनुदान मिळत आहे.त्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खुपच खराब झाली, दैनंदिन आवश्यक कामासाठी निधी नाही,

**विनय गुर्रम** विविध कारणामूळे मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे. त्यावर उपाय योजना करण्यात यावी.

**उमेशसिंह चव्हाण** प्रभाग कार्यालयाकडून देण्यात येत असलेले नळ कनेक्शन बंद करण्यात यावे. ते मुख्य कार्यालयातून देण्यात यावे .

**आयुक्त** ज्या प्रमाणे मुख्य कार्यालयातून बांधकाम परवानगी देण्यात येते, त्याच प्रमाणे नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही मुख्य कार्यालयातून देण्यासाठी आदेश काढण्यात येतील. श्री फारुख हुसने यांचे वार्डातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी स. सदस्य श्री सरजितसिंघ गिल, श्री दिपकसिंह रावत, सौ. राओत्रे, यांची एकत्रित बैठक घेवून मार्ग काढण्यात येईल. श्री फारुख हुसेन यांनी बैठकीची तारीख व वेळ निश्चित करावी.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **सभापाती** |
| नावाशमनपा नांदेड | स्थायी समिती, |
| | नावाशमनपा नांदेड |